Vol-13 Special Issue- 1.3 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# भारतीय संविधानातील वसुधैव कुटुंबकम बाबत विचार

**प्रा.डॉ. सुरेश वि. गाडे**
नानीबाई शिक्षण महाविद्यालय, अमरावती

## प्रस्तावना

विविध खंड एकत्रित केले तर त्याला जग असे आपण परिभाषित केले आहे. जगामध्ये मनुष्य व प्राणी आणि इतर निसर्गसृष्टीचा समावेश होतो. वसुधैव कुटुंबकम चा अर्थ संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे असा होतो. त्यामुळे कुटुंबामध्ये सर्वांना एकमेकांविषयी प्रेम आणि आपुलकी असते. समानतेची भावना असते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संविधान आम्ही भारतीयांना दिले. त्यामध्ये वसुधैव कुटुंबकमचाच विचार आहे असे लक्षात येते. संपूर्ण संविधानाची मांडणी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांवर केलेली आहे. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज ग्रामगीतेतून वैश्विक मानव कल्याणाचा संदेश देतात.

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो । सकळांचे लक्ष तुजकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो । विश्वामाजी या योगे. ।।

प्राचीन काळात विद्यादान हे ब्राह्मण वर्गाचे काम होते. समाजाचे परकीय आक्रमणापासून रक्षण करणे हे क्षत्रियांचे काम होते. देशाचा व्यापार व अर्थव्यवस्था वैश्य सांभाळीत असत, तर समाजसेवा करणे हे शूद्राचे काम होते. प्राचीन काळातील ही वर्णव्यवस्था, समाजातील कामाचे वाटप हे व्यक्तीच्या जन्मावर किंवा कुलावर अवलंबून नव्हते, तर व्यक्ती व्यक्तींमधील गुण आणि कर्म यांवर आधारित होती, अवलंबून होती. या समाजव्यवस्थेत जातिव्यवस्था निर्माण होऊन जातिभेद ही समाजाला कीड लागली. त्यामुळे सामाजिक संघर्ष निर्माण झाले व सामाजिक स्थैर्य धोक्यात आले. राष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासांमध्ये जातिभेदाचा अडथळा निर्माण झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात जातिभेद नष्ट करून सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचे प्रयत्न अनेक विचारवंतांनी केले. समाजातील उच्च-नीचता नष्ट करून अस्पृश्यता निवारण्यासाठी सामाजिक चळवळी घडल्या. यात महात्मा फुले, महात्मा गांधी, वि. रा. शिंदे, शाहू महाराज, साने गुरुजी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठे कार्य केले. स्वातंत्र्योत्तर काळात संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व सामाजिक न्याय या मूल्यांचा स्वीकार केला.

**समतेचा विचार :** संविधानातील भाग तीन, मूलभूत हक्क (सर्वसाधारण) मध्ये समानतेचा हक्क पुढील प्रमाणे देण्यात आलेला आहे.

१४. नुसार कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्य क्षेत्रात कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.

१५(१). नुसार कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

१६. सार्वजनिक सेवा योजनांच्या बाबींमध्ये समान संधी.

१७. अस्पृश्यता नष्ट करणे,

संविधानातील समानतेसंबंधी वरील मुद्दे लक्षात घेतले तर वसुधैव कुटुंबकम विचारधारेला अधिक मजबूत करणारे हे पाऊल आहे. कारण संविधानापूर्वी भारतामध्ये अनेक प्रकारे विषमता होती असे दिसून येते. काही विशिष्ट धर्म. जात, वंश.लिंग व

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

जन्माला विशेषाधिकार देण्यात आले होते. अस्पृश्यता नष्ट करण्यामध्ये संविधानाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे. संविधानामुळे समताधिष्ठित समाज निर्माण होत आहे.

**स्वातंत्र्याचा विचार :** संविधानातील भाग तीन,मूलभूत हक्क,अनुच्छेद 19 मध्ये स्वातंत्र्याचा हक्क पुढील प्रमाणे देण्यात आलेला आहे.

१९(१). नुसार सर्व नागरिकास

(क) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा.

(घ) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्त होणे संचार करण्याचा.

(ङ) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा.

२३. नुसार शोषणाविरुद्धचा हक्क.

२५. नुसार धर्म स्वातंत्र्याचा हक्क.

२९. नुसार संस्कृती व शैक्षणिक हक्क.

वरील प्रमाणे सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य संविधानाने देशातील नागरिकांना दिलेले आहेत. त्यामुळे विश्वात्मक बंधुतेच्या भूमिकेला अधिक बळ मिळालेले आहे. मनुष्याला स्वातंत्र्यापासून दूर ठेवून त्याचे शोषण करणे. ही भूमिका संविधानाने नाकारलेली आहे. नागरिकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. तसेच मुक्तपणे कुठेही संचार करण्याचा अधिकार दिलेला आहे. कुणीही शोषण करीत असेल तर त्याविषयी न्याय मागता येतो. नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्य तसेच सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

**न्याय व बंधुता विचार :** संविधाना च्या उद्देशिकेनुसार व्यक्तीला सामाजिक , आर्थिक व राजनैतिक न्याय मिळविता येतो. तसेच न्याय , स्वातंत्र्य , समता या सोबतच व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता देण्याचे आश्वासन संविधान करीत आहे. आणि ही सर्व मूल्य वसुधैव कुटुम्बकम या संकल्पनेला तंतोतंत जुळतात. कारण विश्वव्यापी शांतता प्रस्थापित करण्याकरिता सर्व व्यक्तींना या मूल्यांची अतिशय गरज आहे. या वसुधेवर (पृथ्वी) राहणारे मनुष्यांनी एकमेकाविषयी प्रेम निर्माण करण्याकरिता स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही तत्वे आत्मसात करणे अतिशय आवश्यक आहे.

**निष्कर्ष :** समाज आणि राष्ट्र यांची प्रगती साधायची असेल तर केवळ आपल्या देशातच नव्हे, तर साऱ्या जगतात शांतता टिकणे आवश्यक आहे. संगणक, इंटरनेट, माहिती तंत्रज्ञान यामुळे जग अतिशय जवळ आले आहे. त्यामुळे जगातील एखाद्या देशात जरी अशांतता असेल तर त्याची झळ इतर सर्व देशांना लागते. आज अमेरिकेने दहशतवाद नष्ट करण्यासाठी अफगाणिस्तानामधील तालिबानविरुद्ध जे युद्ध सुरू केले आहे, त्यातून इंधनाच्या, पेट्रोलच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अँथ्रेक्ससारख्या जैविक युद्धाचा प्रारंभ हा तर जगाला विनाशाकडे नेणारा आहे. या युद्धामुळे अणुयुद्धाचा धोका वाढला आहे. जगातील संघर्ष शांततामय मार्गाने सुटावेत यासाठी विश्वबंधुत्वाची भावना मोलाची ठरते. संयुक्त राष्ट्र, दक्षिण आशियाई देशांची संघटना (सार्क), राष्ट्रकुल संघटना यांद्वारे भारत जागतिक सामंजस्य व शांतता प्रस्थापित रण्याचा पुरस्कार करीत आला आहे. आपला देश दुष्काळ, भूकप, महापूर, युद्धे अशा आपत्तींच्या प्रसंगी इतर देशांना मदतीचा हात पुढे करतो. राष्ट्रा-राष्ट्रांत सहकार्य व प्रेमाची भावना वाढविणे ही काळाची गरज आहे.. विश्व हे एक कुटुंब आहे अशी उदयोत्सुक भारतीय समाजाची धारणा आहे. सर्व देश या कुटुंबाचे सदस्य आहेत. त्या सर्वांचा मानवता हा धर्म आहे. सर्वांनी सलोख्याने व बंधुभावनेने जगणे आवश्यक आहे. त्यासाठी परस्पर सहकार्य, सहिष्णुता, सहृदयता बाळगणे आवश्यक आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## संदर्भसुची -

भारत सरकार, विधी व न्याय मंत्रालय,भारताचे संविधान,( मराठी २००६ वी आवृत्ती), संचालक , शासन मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य.

राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज, ग्रामगीता (२०२५ एकतिसावी आवृत्ती ), श्री गुरुदेव प्रकाशन, तिवसा, जि. अमरावती.

करंदीकर , डॉ. सुरेश, मंगरूळकर,डॉ.मीना, उदयोत्सुक भारतीय समाजातील शिक्षण,(२०१०), फडके प्रकाशन , कोल्हापूर.